म. प्र. ... ालय, ठ.
विषय धा. वा.
द्रा. क्र. ६६३४





# अधिकमास-कथा

# प्रास्ताविक दोन शब्द

अधिक मास हा सुमारें पावणेतीन वर्षांनीं एकदां येत असतो. हा मोठा पुण्यपावन मास मानलेला आहे. त्याचीं कारणें सांगणाऱ्या कथाही संस्कृत व प्राकृत ग्रंथांत आहेत. 'अधिकमास महात्म्य' नांवाचा एक प्राकृत ओवीबद्ध ग्रंथ आहे. पण तो आतां दुर्मिळ आहे. त्याचें सारही दुर्मिळच आहे. शिवाय असे मोठे ग्रंथ वाचण्याइतकी फुरसतही अलीकडच्या लोकांना नाहीं. पण अधिक-मास-महात्म्य जाणून घेण्याची इच्छा मात्र पुष्कळ ठिकाणीं दिसून येते. म्हणून या महात्म्यांतील निवडक कथा अगदीं थोडक्यांत या पुस्तकांत दिल्या आहेत. त्यांच्या वाचनानें व श्रवणानें सर्वांचे इच्छित मनोरथ पूर्ण होवोत हीच त्या सर्वसाक्षी पुरुषोत्तमाकडे प्रार्थना आहे !

—निवेदक

## कथाक्रम


१. नर-नारायणाशीं नारदाची भेट
२. तीन लोक
३. गो—लोकीं गमन
४. पुरुषोत्तमाकडून वरदान
५. द्रौपदीला पांच नवरे कां ?
६. अभावित पुण्याचा प्रभाव
७. वानराला मोक्ष मिळाला !
८. गोदानच श्रेष्ठ कां ?
९. सत्पात्र ब्राह्मणांची पूजा
१०. मत्सरानें घात केला !
११. मांजराचें नशीब
१२. मणिग्रीवाची कहाणी
१३. कांहीं सोपीं व्रतें
१४. पंचपर्व—महिमा
१५. पुण्यदानानें पतितोद्धार
१६. भूताची मुक्ति
१७. गुणवती विरुद्ध यशोमती
१८. श्रीपुरुषोत्तमस्तोत्रम् ।



( सर्व हक्क प्रकाशकांचे स्वाधीन )



: प्रकाशक :
रा. सा. सारंग,
बी. आय. टी. चाळ, नं. ४
परळ, मुंबई १२.

: मुद्रक :
रघुनाथ दिपाजी देसाई,
न्यू भारत प्रिंटिंग प्रेस,
६, केळेवाडी, गिरगांव मुंबई ४

२९८४
बा...
२०९६
२१५१०

# अधिक मास-कथा

## १ नर-नारायणाशीं नारदाची भेट

हिमालयानजीक बदरिकारण्य या नांवाचें एक अरण्य होतें. तिथें नर-नारायण ऋषि तप करीत असत. एकदां नारदमुनि तिथें गेला. त्यानें नारायण ऋषीला नमस्कार केला आणि त्याला विचारलें, 'मुने, हें तप कशासाठीं करीत आहां. पूर्वीं एकानें तप केलें तर त्याचें पुण्य सभोंवतालच्या सर्व लोकांना मिळे आणि पाप केलें तर तेंही सर्वांना भोगावें लागे. या कलियुगांत तशी स्थिति नाहीं. कलियुगांत जो तो आपापल्या पाप-पुण्याला मालक असतो. तुम्ही तर महान् ऋषि, तुम्ही हें तप कशासाठीं आचरीत आहां?'

नारायण ऋषि म्हणाले:—नारदा, सांप्रत एका नव्या ऋषीचा जन्म झाला आहे, त्याचें मी चिंतन करीत आहें.

नारदानें विचारलें:—कोणता तो ऋषि?

नारायण ऋषि म्हणाले:—त्या ऋषीचें नांव 'पुरुषोत्तम' ऋषि असें आहे. वर्षाच्या बारा महिन्यांचे बारा स्वामी आहेत. पण या वर्षीं आणखी एक तेरावा महिना यावयाचा आहे. त्याचें नांव 'पुरुषोत्तम मास' व त्याच्या स्वामीचें नांव पुरुषोत्तम ऋषि होय. त्याचें चिंतन मी करीत आहें.

नारद म्हणाला:—असें का? मग मलाही या मासाची माहिती सांगाना. म्हणजे मी ती मृत्युलोकीं सर्वांना सांगेन आणि त्यायोगें मृत्युलोकांतील दुःख-दारिद्र्य नष्ट होईल.

नारायण ऋषि म्हणाले :—पूर्वी कौरवांनीं कपट-द्यूत खेळून पांडवांचें सर्वस्व हरण केलें; द्रौपदीची विटंबना केली आणि त्यांना बारा वर्षें वनवास व एक वर्ष अज्ञातवास भोगावयास लाविलें. त्यावेळीं पांडव काम्यक नांवाच्या वनांत राहात होते. एकदां श्रीकृष्ण त्यांच्या भेटीला गेले असतां पांडवांनीं त्यांची पूजा केली आणि नंतर दोघे गुजगोष्टी करीत बसले. धर्मराजानें प्रश्न करावयाचा आणि श्रीकृष्णानें त्याचें उत्तर द्यावयाचें असें बराच वेळ चाललें होतें. त्या वेळीं त्यांच्या संभाषणांत आलेल्या कथा तुला सांगतों. म्हणजे सर्व उलगडा होईल.

असें म्हणून नारायण ऋषींनें एकेक कथा नारदाला सांगितली. त्यांतल्या कांहीं कथाच इथें दिल्या आहेत.

## २ तीन लोक

स्वर्ग, मृत्यु आणि पाताळ असे लोक आपल्याला माहीतच आहेत. पण याशिवाय आणखी तीन लोक अंतराळांत आहेत. पहिला गो-लोक. हा सर्वांत वर आहे. तो सर्व रत्नभूमीचा बनलेला आहे. तो अंतरिक्षांत अधांतरींच आहे. त्या ठिकाणीं रोग, म्हातारपण अगर मृत्यु यांचें नांवही नसतें. तिथलीं मंदिरें रत्नखचितच आहेत, आणि तीं किती आहेत हें कोणालाही सांगतां येणार नाहीं. या गो-लोकाच्या बऱ्याच खालीं उजव्या बाजूला वैकुंठ-लोक आहे. तिथले सारे पुरुष श्रीविष्णूसारखे व स्त्रिया श्रीलक्ष्मीसारख्या आहेत. तिसरा शिव—लोक. हा

वैकुंठ-लोकाच्या बरोबर समोर डाव्या बाजूला आहे. तिथली सारी वस्ती शिव अथवा पार्वती-स्वरूपी आहे. प्रत्यक्ष यमही तिथें जाण्याला धजत नाहीं.

या तीन्ही लोकांकडे जाणारे मार्ग अंतरिक्षांतूनच आहेत. गो-लोकाच्या मध्यभागीं एक सुंदर ज्योति आहे आणि त्या ज्योतींत रत्नसिंहासनावर एक दिव्य बालमूर्ति बसलेली असून तिच्या हातांत तापलेल्या सुवर्णासारखी मुरली आहे. या बालमूर्तीलाच ' पुरुषोत्तम ' म्हणतात.

## ३ गो-लोकीं गमन

पूर्वीं एकदां वर्षाचे बाराच महिने होते. शुद्ध प्रतिपदेपासून पौर्णिमेपर्यंतचा एक पंधरवडा; व वद्य प्रतिपदेपासून अमावास्ये-पर्यंतचा दुसरा पंधरवडा, मिळून तीस तिथींचा एक महिना होत असे. बारा महिने झाले म्हणजे ३६० तिथी होत. पण एवढ्या वेळांत सूर्याची एक वर्षाची फेरी पुरी होत नसे. ती पुरी होण्याला आणखी सुमारें ११ दिवस लागत. तेव्हां हें अंतर भरून काढण्यासाठीं सुमारें तीन पावणेतीन वर्षांनीं अधिक मास धरावा असें ऋषींनीं ठरविलें. पण या महिन्याला लोक नाकें मुरडूं लागले. कारण त्या महिन्यांत संक्रांत नसे. इतर महिन्यांत एकेक संक्रांत असे. सणवारही त्या महिन्यांत असत, तसे या अधिक महिन्यांत नसत. म्हणून लोक म्हणूं लागले, हा अधिक मास म्हणजे मलमास—अगदीं घाणेरडा महिना आहे. या महिन्यांत शुभकार्यें होत नाहींत तेव्हां हा अशुभ आहे. त्याचें कोणी तोंडही पाहूं नये.

सारे लोक आपली निंदा करतात हें पाहून अधिक मासाला वाईट वाटलें आणि तो श्रीहरीला शरण गेला. त्यानें श्रीहरीची प्रार्थना केली कीं 'या जगांत तुझ्या आज्ञेवांचून कांहीं होत नाहीं. तूं ब्रह्मांडनायक आहेस. या सृष्टींतील प्रत्येकाला कांहीं ना कांहीं नांवें आहेत, त्यांचे स्वामी आहेत, आणि त्या स्वामींच्या अधिकारानें सर्व जग चाललें आहे. पण मी मात्र निराश्रित आहें. मला नांव नाहीं, धनी नाहीं, म्हणून माझा शुभ कार्यांत त्याग करतात. मला घाणेरडा म्हणतात. तेव्हां असलें हें निंद्य जिणें जगण्यापेक्षां मरण बरें असें वाटतें.'

हें भाषण करीत असतां त्याचें हृदय इतकें उचंबळून आलें होतें, कीं भाषणाच्या शेवटीं तोल जाऊन तो जमिनीवर पडला आणि मूर्च्छित झाला.

श्रीहरीला ही त्या मासाची करुण कहाणी ऐकून दया आली. त्यानें गरुडाकडून त्याला वारा घालून शुद्धीवर आणलें आणि त्याचें सांत्वन करून म्हटलें, "वत्सा, वर ऊठ. तुझें हें दुःख मोठें आहे. पण यावर एक उपाय आहे. चल आपण गो-लोकाला जाऊंया, आणि त्या त्रैलोक्यनाथ श्रीपुरुषोत्तमाची प्रार्थना करूं या. म्हणजे तो तुझें दुःख निवारण करील."

याप्रमाणें बोलून श्रीहरि त्या 'मलमासा'ला घेऊन गो-लोकाला गेले. तिथें पुरुषोत्तमानें श्रीहरीचें स्वागत करून त्याला रत्नजडित सिंहासनावर बसविलें. त्याच्यामागें मलमासही हात जोडून उभा राहिला. त्याच्या डोळ्यांतून अश्रु गळत होते आणि अंग थरथर कांपत होतें.

# ४ पुरुषोत्तमाकडून वरदान

पुरुषोत्तम व श्रीहरि यांचे कुशल प्रश्न झाल्यावर पुरुषोत्तमानें मलमासाकडे पाहिलें आणि तो श्रीहरीला म्हणाला :– ' विष्णो, हा बरोबर कोण आणला आहेस ? याचें नांव काय ? आणि हा रडतो काय म्हणून ? इथें या गो-लोकांत कोणासही दुःख प्राप्त होत नाहीं. असें असतां हाच रे याला अपवाद कसा दिसतो.

श्रीहरि म्हणाले :—हा मृत्युलोकांतला एक कालाचा विभाग आहे. तिथें दिवस, पक्ष, मास, वर्ष या सर्वांना नांवें आहेत. त्यांचे ठरलेले स्वामीही आहेत. पण हा जन्माला आला तो अद्यापि नामहीन व स्वामिहीनंच आहे. इतर साऱ्यांची तिथें पूजा होते. त्यामुळें ते गर्विष्ठ बनून याची निंदा करतात. याला हीनं, मलिन, निंद्य मानतात. हा चंद्राच्या गतीच्या फेऱ्यांत जन्माला आला आहे. याचें तोंड पाहूं नये म्हणतात. म्हणून याला दुःख होऊन हा माझ्याकडे आला. मी तरी काय करणार ? म्हटलें, चल, आपण पुरुषोत्तमाकडे जाऊं. म्हणून याला इथें घेऊन आलों.

यावर श्रीपुरुषोत्तम म्हणाले :—वाहवा रे वाहवा ! अरे, तूं आणि मी दोन का आहों ? तूं माझा प्राण. तूं ज्याचा स्वीकार केलास तो मींच केला यांत संशय का आहे ? तेव्हां आतां याचें नांव ' पुरुषोत्तम ' असें ठेवूंया आणि मीच त्याचा स्वामी होतों. माझा याला असा वर आहे कीं ' याच्या नांवानें विश्व पवित्र होऊन याची पूजा करणाऱ्याचें दारिद्र्य व दुःख हा

अधिक-मास हरण करील. तसेंच या पुरुषोत्तम मासांत जे स्नान–दान–जपादि–कर्मे करतील ते मृत्युलोकीं नाना भोग भोगतील आणि शेवटीं गो-लोकीं येऊन येथें चिरंतन वास करतील. या मलमासाचा मीच अधिपति होऊन याला सर्व महिन्यांचा राजा केला आहे. याच्या भक्तांच्या चिंता मीच दूर करीन व त्यांच्या इच्छा पूर्ण करीन. पुत्रापेक्षां जसें नातवावर प्रेम अधिक असतें तसेंच माझ्या पूजेपेक्षां माझ्या भक्तांचें पूजन मला अधिक प्रिय वाटतें. तीन वर्षांनीं येणाऱ्या अधिक मासांत जे धर्मकर्मे आचरणार नाहींत अथवा मनांत आणणार नाहींत त्यांना मरेपर्यंत दुःख भोगावें लागेल; पण जे या अधिक मासांत स्नान-पूजा-जपादि कर्मे करतील आणि शक्तीप्रमाणें दान देतील त्यांना मी प्रसन्न होईन.'

श्रीपुरुषोत्तमाचें हें आश्वासन ऐकून श्रीहरीही संतुष्ट झाले आणि मलमासाला–आतां पुरुषोत्तम मासाला–घेऊन वैकुंठाला आले. आणि तिथून मग हा पुरुषोत्तम-मास श्रीहरीचें स्मरण करीत मृत्युलोकीं आला.

## ५ द्रौपदीला पांच नवरे कां ?

पूर्वीं मेधावी नांवाचा एक ब्राह्मण होता. त्याला एक मुलगी झाली. पण तिच्या जन्मानंतर थोड्याच दिवसांत तिची आई वारली. तेव्हां या एकुलत्या एका कन्येच्या पालनपोषणाची जबाबदारी मेधावीवरच पडली. ती त्यानें उत्तम प्रकारें पार पाडली. दिवसा–मासांनीं वाढतां वाढतां ही कन्या उपवर

झाली. तेव्हां मेधावी तिच्यासाठीं वर शोधूं लागला. पण मनासारखा वर कांहीं मिळेना. एक दिवस तो असाच चिंताक्रांत होऊन बसला असतां त्याला काळज्वरानें गांठलें आणि त्यांतच त्याचा अंत झाला. तेव्हां ही मुलगी अगदींच निराधार झाली.

आपलें पुढें काय होणार, या चिंतेंतच ती दिवसरात्र कांढीत असे. पुढें एकदां दुर्वास ऋषीची स्वारी तिथें आली. दुर्वास हा महाकोपी ऋषि. तो जाईल तिथें त्याचें यथायोग्य स्वागत न झालें तर तो लगेच शाप देऊन कोणावर काय प्रसंग आणील याचा नेम नसे !

पण मेधावीच्या या चतुर मुलीनें त्याचें यथास्थित स्वागत करून त्याला संतुष्ट केलें आणि हळूच आपल्या दुःखाची कहाणी त्याच्या कानावर घातली. दुर्वासानें थोडा वेळ विचार केला आणि तो तिला म्हणाला, " बाळे, शोक करूं नको. आतां यापुढें तिसरा महिना पुरुषोत्तम मास म्हणून येणार आहे, त्यावेळीं ' पुरुषोत्तम व्रत ' कर म्हणजे तुझी इच्छा पूर्ण होईल. "

दुर्वासाचें हें बोलणें त्या ब्राह्मणकन्येनें शांतपणें ऐकून घेतलें. पण तिच्या पित्याकडून तिला जें शिक्षण मिळालें होतें त्यांत कार्तिक-माघ-वैशाख इत्यादि महिन्यांचें अतिशय महत्त्व सांगितलें होतें. दुर्वासानें त्या सर्व महिन्यांपेक्षां अधिक मासच श्रेष्ठ असें सांगितलें तें तिला पटलें नाहीं. ती म्हणाली :—मुने, आपण जें सांगितलें तें मला रुचत नाहीं. संक्रांति नसल्यामुळें ज्याला निंद्य

मानतात त्या अधिक महिन्याची तुम्ही स्तुति गातां या आपल्या धाडसाचें मला आश्चर्य वाटतें. सूर्याला सोडून काजव्याची वाखाणणी करावी तसेंच तुम्ही केलेंत ! '

मग काय विचारतां ? दुर्वासच तो ! मुलीचें हें भाषण ऐकून संतापानें लाल झाला ! एवढोशी मुलगी माझ्या तोंडावर मला मूर्ख ठरवूं पाहते याचा त्याला विस्मय वाटला. पण कांहीं झालें तरी पोर आहे, पोरपणामुळें ती असें बोलली, तिला शाप देऊन जगांतून उठवून लावणें योग्य नाहीं असाही विचार तितक्यांत त्याच्या मनांत आला आणि तो म्हणालाः—' बाळे, तूं महान अपराध केला आहेस. पुरुषोत्तम मासाचा महिमा पंडितांनाहि कळत नाहीं, तेव्हां तुझ्यासारख्या अजाण पोरीला काय कळणार ? पण तुझ्या तोंडून पुरुषोत्तम मासाची जी अवहेलना झाली तिचें प्रायश्चित्त या जन्मीं नाहीं तरी पुढल्या जन्मीं तुला भोगावेंच लागेल. यापेक्षां मी आतां जास्त कांहीं सांगत नाहीं. तुझें क्षेम असो ! '

असें बोलून दुर्वास निघून गेला. इकडे ब्राह्मणकन्येनें आतां श्री शंकराची आराधना केली. श्रीशंकर प्रसन्न झाले आणि त्यांनीं तिला ' वर माग ' म्हणून सांगितलें. तेव्हां त्या मुलीच्या अंतर्यामीची इच्छा एकदम उसळी मारून वर उठली आणि तिच्या तोंडून ' पति दे, ' ' पति दे, ' ' पति दे, ' ' पति दे ' ' पति दे ' असे शब्द बाहेर पडले.

श्रीशंकर म्हणाले ' बाळे, तूं बोललीस तसेंच होईल.

'पति दे' असें पांच वेळ तूं म्हणालीस, तेव्हां तुला एकच नव्हे तर पांच पति मिळतील समजलीस ?'

शिवाचें हें वचन ऐकून ब्राह्मणकन्या उठून उभी राहिली आणि म्हणाली:—'भगवान् असें अभद्र काय बोलतां ? एका नारीला एकच पति असा सदाचार आहे. तेव्हां माझ्याविषयीं असलें बोलणें तुम्हांला शोभलें का ?'

श्रीशंकर हंसून म्हणाले:—'माझा वर कधीं खोटा व्हावयाचा नाहीं, आतां इतकेंच होईल कीं तुला पांच पति व्हावयाचे ते या जन्मीं न होतां पुढल्या जन्मीं होतील.'

इतकें बोलून श्रीशंकर गुप्त झाले, पुढें ती ब्राह्मणकन्या कांहीं कालानें त्या जन्मीं पति न मिळतांच वारली. पण पुढल्या जन्मीं द्रुपद राज्याच्या घरीं जन्म घेऊन ती 'द्रौपदी' झाली. आणि तिचें पुढें पांच पांडवांशीं लग्न झालें. ती कथा महाभारतांत आली आहे.

## ६ अभावित पुण्याचा प्रभाव

पूर्वी हैहय देशांत चित्रधर्मा नांवाचा राजा होता. त्याच्या मुलाचें नांव दृढधन्वा. हा मुलगा मोठा पराक्रमी निघाला, तेव्हां चित्रधर्म्यानें राज्य मुलाच्या हातीं देऊन आपण वानप्रस्थाश्रम स्वीकारला म्हणजे तपश्चर्येसाठीं तो वनांत निघून गेला.

दृढधन्व्याच्या बायकोचें नांव गुणसुंदरी असें होतें. तिच्या पोटीं

चित्रवाक, चित्रवह, मणिमान आणि चित्रकुंडल असे चार मुलगे आणि चारुमती नांवाची मुलगी अशीं पांच अपत्यें झालीं.

एकदां हा दृढधन्वा राजा एकान्तांत विचार करीत बसला असतां त्याच्या मनांत आलें कीं, माझें हें वैभव कशामुळें मला प्राप्त झालें असेल बरें? ही शंका वारंवार मनांत येत असतांच तो एकदां शिकारीसाठीं वनांत गेला. तिथें त्यानें एका हरणावर बाण सोडला. तो बाण त्या हरणाच्या शरीरांत घुसला. तथापि तें हरण खालीं न पडतां पळत सुटलें. तेव्हां राजाही त्याच्या मागोमाग धावत गेला. होतां होतां दोन प्रहरची वेळ झाली. ऊन तर मी म्हणत होतें. तेव्हां त्या हरणाचा नाद सोडून राजा जवळच्या एका तळ्यावर पाणी पिण्यासाठीं थांबला. तिथें पाणी पिऊन नि घोड्यालाही पाजून तो विश्रांतीसाठीं एका वडाच्या झाडाखालीं जाऊन बसला.

इतक्यांत त्या झाडावर एक पोपट बसला होता तो मोठ्यानें म्हणाला, ' राजा, या पृथ्वीवरील दृश्य सुखास भुलून तें तूं मुख्य मानतोस; तत्त्वाचा विचारच करीत नाहींस; तो तूं पार कसा पावशील ? '

पोपटाच्या या शब्दांचा राजा विचार करीत आहे तोंच तो पोपट तिथून उडाला नि दिसेनासा झाला. पुढें राजा घरीं आला आणि बरेच दिवस त्या पोपटाच्या शब्दांचा अर्थ काय

असावा याचा विचार करीत होता. पण त्याचें समाधान झालें नाहीं.

पुढें एकदां वाल्मीकि ऋषि दृढधन्व्याच्या घरीं आले, तेव्हां राजानें आपली शंका त्यांना विचारली. वाल्मीकीनें थोडा वेळ विचार केला आणि त्याला सांगितलें :—' राजा, तुझें हें सध्याचें भाग्य तुझ्या पूर्वजन्मींच्या सुकृताचें फळ आहे. मागच्या जन्मीं तूं द्रविड देशांत सुदेव नांवाचा ब्राह्मण होतास. तुझी बायको गौतमी नांवाची होती. तुम्हांला पुष्कळ दिवस मूलबाळ नव्हतें. म्हणून तूं श्रीहरीची आराधना केलीस. श्रीहरि प्रसन्न झाल्यावर तूं पुत्र-प्राप्तीचा वर मागितलास. पण तुझ्या नशिबीं पुत्रसुख नव्हतें. म्हणून श्रीहरीनें दुसरा वर मागण्यास सांगितलें. पण तुझी समजूत कांहीं पटेना. शेवटीं श्रीहरीचें वाहन जो गरुड त्यानें मध्यस्थी केली. तेव्हां तुला एक गुणवान् पण अल्पायुषी असा पुत्र होईल असा आशिर्वाद श्रीहरीनें दिला. त्याप्रमाणें पुढें तुम्हांला पुत्र झाला. त्याचें नांव तुम्ही 'शुकदेव' असें ठेविलें. हा मुलगा मोठा बुद्धिमान निघाला. पण वयाच्या बाराव्या वर्षींच जलक्रीडा करीत असतां पाण्यांत बुडून मृत्यु पावला. तुम्हां उभयतांच्या दुःखाला पारावार राहिला नाहीं. तुम्हीं एक महिना उघड्यावर मुलाचें प्रेत मांडीवर घेऊन दुःख करीत होतां. दररोज आकाशांत मेघ जमून जलवृष्टी करीत होते. त्यांत तुमचें अंग भिजून जात असे. अन्नपाणी तुम्हीं वर्ज्यच केलें होतें. त्यामुळें महिनाभर तुम्हांला उपवास घडला.

अशा रीतीनें एक महिना गेला. पण काय चमत्कार सांगावा ? महिन्याच्या शेवटच्या दिवशीं श्रीहरि साक्षात् तुमच्या पुढें येऊन उभे राहिले आणि त्यांनीं तुमच्या पुत्राला उठवून तुम्हां सर्वांना वरदान दिलें कीं, ‘ ह्या जन्मीं तर तुम्हांला सर्व प्रकारचें ऐश्वर्य व सुख मिळेलच, पण पुढच्या जन्मींही तूं दृढधन्वा नांवाचा राजा होशील आणि तुझी ही बायको ‘ गुणसुंदरी ’ होऊन तुझी राणी होईल. ’

वाल्मीकि ऋषि म्हणाले, “ हें कसें झालें समजलें का ? तो महिना अधिक मास होता. अधिक मासांत जरी एक उपवास केला तरी सर्व पापें नाहींशीं होतात. एक स्नान घडलें तरी सर्व तीर्थ-स्नानांचें फल मिळतें. मग तुम्हीं तर सबंध महिना उपवासी होतां आणि दररोज तुम्हांला पावसाच्या पाण्यानें स्नान घडत होतें. त्या सर्व पुण्याच्या योगानेंच तुम्हांला त्या जन्मीं मृत्यु आल्यावर प्रथम वैकुंठलोक भोगावयास मिळाला व त्यानंतर तुझा या राजकुलांत जन्म होऊन तूं ऐश्वर्य भोगीत आहेस. गुणसुंदरी ही तुझी पूर्व-जन्मींची पतिव्रता स्त्री होय; आणि तुला जो पोपट आढळला तो तुझा पूर्वजन्मींचा शुकदेव पुत्र होय. त्यानें जे शब्द उच्चारले ते त्याला पूर्वजन्मींचें स्मरण आहे म्हणून. तुम्ही आतां राज-पदाचे सगळे सुखसोहळे उपभोगीत आहां. पण या सुखांत गर्क होऊन तुमचें चित्त जर श्रीहरीच्या भजनांतून उडेल तर तुमचा विनाश होईल. म्हणून त्यानें तुम्हांला तो इशारा दिला आहे. ” असें सांगून वाल्मीकि, राजाचा निरोप घेऊन निघून गेले.

# ७. वानराला मोक्ष मिळाला !

पूर्वीं कदर्य नांवाचा एक कद्रू ब्राह्मण होता. तो सारा जन्म द्रव्यसंचय करीत होता. त्यानें कधीं द्रव्याचा उपभोग घेतला नाहीं कीं कोणत्याही प्रकारच्या दानांत त्या द्रव्याचा व्यय केला नाहीं. अशा त्या ब्राह्मणाला एकदा एका बागेच्या माळ्यानें बागेच्या रक्षणासाठीं ठेवलें. तिथें तो चोरून फळें विकी व आलेला पैसा पुरून ठेवी. या त्याच्या विश्वासघाताच्या पापाबद्दल मृत्यूनंतर यमराजानें त्याला वानराच्या जन्माची शिक्षा दिली. त्याप्रमाणें 'मृगतीर्थ' नांवाच्या एका सरोवराच्या कांठीं तो वानरजन्म पावून कित्येक दिवस झाडपाल्यावर व फळांवर निर्वाह करून होता. पण पूर्वजन्मींचें पाप अद्यापि संपलें नव्हतें. म्हणून पुढें त्याच्या तोंडाला व्रण झाला. त्यामुळें त्याला कांहीं खातां येईना. साहजिकच त्याला उपवास घडूं लागले. त्याच सुमारास अधिक मास आला आणि त्या वानराला थंडीवात झाला ! तशा स्थितींत मोठ्या कष्टानें या झाडावरून त्या झाडावर फिरत असतां एकदां झोंक जाऊन तो वर सांगितलेल्या 'मृगतीर्थ' कुंडांत पडला. शक्ति नसल्यामुळें त्याच्यानें बाहेर येववेना. अधिक मासांतील कृष्णदशमीपासून चार दिवस तो पाण्यांत बुचकळत होता. पांचव्या दिवशीं त्याचें तिथेंच प्राणोत्क्रमण झालें. पण त्या अधिक मासांतील नकळत झालेल्या स्नानानेंच त्याला दिव्य देह प्राप्त झाला. आणि तो विमानांतून वैकुंठीं गेला. नकळत घडलेल्या स्नानानें जर एवढें पुण्य तर मुद्दाम संकल्प करून केलेल्या स्नानाचें फल केवढें असेल बरें ?

# ८ गोदानच श्रेष्ठ कां ?

एकदां लक्ष्मीनें श्रीहरीला विचारलें कीं--मृत्युलोकांत जे अज्ञानी, निर्धन, दुराचारी असतील त्यांना तरणोपायाचा मार्ग कांहीं आहे कीं नाहीं ? त्यावर श्रीहरि म्हणाले :—हो, मार्ग नसायला काय झालें ? त्यांनीं संतसंग धरावा म्हणजे त्यांना मार्ग सांपडेल. पण त्यांतही अधिकमासांत जो गोप्रदान करील त्याला तर वैकुंठप्राप्ति हटकून होईल. श्रीलक्ष्मी म्हणाली :—गोदानाला एवढें महत्त्व कशानें प्राप्त झालें आहे ? त्यावर श्रीहरि म्हणाले:—

सर्व ब्रह्मांडांत धेनुदैवत श्रेष्ठ असून तिच्या शरीरांत चौदा भुवनें वास करतात. गाईच्या अंगास स्पर्श केल्यानें सर्व पापांचें भस्म होतें; दर्शनानें उत्तम फल मिळतें; शेपटीस स्पर्श केल्यानें दारिद्र्य, दुःख, रोग, क्लेश नाहींसे होतात. गाईच्या शेणांत यमुना, मूत्रांत नर्मदा, व दुधांत गंगा राहते. रोमरंध्रांत तीर्थें व सर्वांगांत दैवतावांचून रिकामें स्थानच नाहीं. वेद–शास्त्रें–पुराणें गाईच्या अंगांत वास करतात. तिच्या दहीं–दूध–तुपानें यज्ञयागादि कर्में होतात. म्हणून यज्ञकर्मास मुख्य धेनूच होय.

गाईच्या शेणानें वस्तूंस पवित्रता येते. गाईच्या दुधासारखें दुसरें अमृत नाहीं असें ब्रह्मदेवाचें वचन आहे. यास्तव स्वर्गसुख भोगण्याची ज्याची इच्छा असेल त्यानें गाईची सेवा करावी. जे अधिक मासांत गाईची पूजा करून तिला प्रदक्षिणा घालतील त्यांस मोठा लाभ होईल.

गाय ही रविकन्या असून जगाचें कल्याण व यज्ञसिद्धी व्हावी म्हणून मृत्युलोकीं उत्पन्न झाली आहे. अधिक मासांत गाईची पूजा करून सुपात्र ब्राह्मणास दान दिल्यानें पापांचा नाश होऊन पूर्वज स्वर्गलोकीं जातात. सुपात्र ब्राह्मण कोण ? तर "सदोदित खरें बोलणारा, लोभहीन, तपस्वी, दयाळू, षट्कर्मे करणारा, सात्विक, स्वधर्मानें वागणारा, न्यायानें कुटुंबपोषण करणारा, ईश्वराचें नामस्मरण रात्रंदिवस करणारा तोच सुपात्र ब्राह्मण होय."

## ९ सत्पात्र ब्राह्मणाची पूजा

सुपात्र किंवा सत्पात्र ब्राह्मण कोणाला म्हणावें हें मागच्या कथेच्या शेवटीं सांगितलेंच आहे. अशा ब्राह्मणाची पूजा केल्यानें या लोकीं ऐश्वर्य नि परलोकीं उत्तम गति मिळते. आणि अशा ब्राह्मणाचा क्रोध कधीं कधीं अतिशय त्रासाला कारण होतो. याविषयींची एक कथा आहे ती अशी :—

श्रीकृष्णाला सोळा सहस्र बायका होत्या. अर्थात् त्यांना मुलेंही पुष्कळ झालेलीं होतीं. त्यांत प्रद्युम्न, सांब इत्यादि त्यांचे कांहीं मुलगे विशेष प्रसिद्ध होते. ते एकदां क्रीडा करण्यासाठीं वनांत गेले. खेळतां खेळतां त्यांच्या अंगांतून घामाच्या धारा वाहूं लागल्या. म्हणून ते पाण्याचा शोध करीत हिंडूं लागले. इतक्यांत त्यांना एक कूप आढळला. पण पुढें आंत डोकावून पाहतात तों त्यांत पाणी नसून एक भला मोठा सरडा मात्र तिथें होता. त्यांनीं त्या सरड्याला बांधून वर काढण्याचा प्रयत्न चालविला. पण तो

कांहीं वर निघेना. तेव्हां हें वृत्त त्यांनी श्रीकृष्णाला जाऊन सांगितलें. श्रीकृष्ण तिथें आले आणि त्याला त्यांनीं डाव्या हातानें वर ओढून काढलें. पण वर येतो तों काय ? त्या सरड्याचें कल्पनातीत रूपांतर होऊन तापलेल्या सुवर्णाच्या वर्णासारखा एक दिव्य पुरुष तिथें दिसूं लागला !

ही अद्‌भुत घटना पाहून सर्वांना आश्चर्य वाटलें. 'आणि तूं कोण ? व तुझी अशी दशा कां झाली होती ?' असें त्यांनीं त्या पुरुषाला विचारलें. तेव्हां तो म्हणाला :—

"मी पूर्वींचा इक्ष्वाकु कुलांतला 'नृग' नांवाचा राजा. त्यावेळच्या दात्यांत मी अग्रगण्य होतों. रोज एक नवीन ब्राह्मण बोलावून आणावा व त्याची पूजा करून त्याला सोनें, भूमि, हत्ती, घोडे इत्यादि दानें द्यावीं असा माझा क्रम होता. दुधाळ, तरुण, सवत्स अशा गाईही मीं पुष्कळ दान दिल्या.

असा क्रम चालला असतां एका ब्राह्मणास दिलेली गाय चुकून माझ्या गोठ्यांत येऊन राहिली. ती मीं न जाणतां नित्याप्रमाणें दुसऱ्या एका ब्राह्मणास दान दिली. तिला तो ब्राह्मण घेऊन जात असतां प्रथम ज्याला गाय दान दिली होती तो धनी येऊन ठेपला. दोघांचें भांडण जुंपलें आणि माझ्यावर ठपका आला. मीं त्यांना एका गाईऐवजीं हजार गाई देतों म्हणून सांगितलें. पण कोणीच ऐकेना. शेवटीं दुसरा ब्राह्मण गाय घेऊन गेला आणि पहिल्या ब्राह्मणानें मला शाप दिला कीं 'तूं सरडा होऊन पडशील.'

पुढें सृष्टिनियमाप्रमाणें मी हें जग सोडून गेलों तों यमानें मला विचारलें, 'अरे, तूं प्रथम शुभ भोगतोस कीं अशुभ

तें सांग. तूं केलेल्या पुण्यकर्माला अंतच नाहीं. तेव्हां तुझ्या नांवावर शुभ पुष्कळ नि अशुभ फार थोडें आहे. तेव्हां त्याची निवड करण्याचें काम तुझ्यावरच सोंपवितों ' मीं प्रथम ' अशुभ ' मागितलें. तेव्हां यमानें मला मृत्युलोकांत पाठविलें, आणि मी सरडा होऊन पडलों. पण माझ्या पदरीं जें पुण्य होतें त्यामुळें आतां मला मागील जन्माची आठवण झाली आणि श्रीकृष्णा, तुझ्या दर्शनानें मला हें दिव्यरूप प्राप्त झालें. आतां मी येतों. मजवर कृपादृष्टि ठेवा. "

नृगराजा एवढें बोलत आहे तोंच एक दिव्य विमान खालीं आलें आणि त्यांत बसून नृगराजा ब्रह्मलोकीं गेला.

तात्पर्य, एका सत्पात्र ब्राह्मणाचा—अकारणच कां होईना —शाप एका राजाच्या इतर पुण्यकृत्यांवर चंद्रावरच्या डागाप्रमाणें कलंकाला कारण झाला. म्हणून ब्राह्मणाचा क्रोध होईल असें कृत्य करूं नये. अधिक मासांत ब्राह्मणपूजा केली असतां सर्व देवता तृप्त होतात. गंगादि तीर्थांच्या स्नानानें जें पुण्य घडतें त्यापेक्षां अधिक ब्राह्मणपूजनानें मिळतें. म्हणून सर्वांनीं अधिक मासांत एकदां तरी ब्राह्मणपूजा करून त्यास संतुष्ट करावें.

## १० मत्सरानें घात केला !

पूर्वीं मथुरापुरांत शाकली नांवाचा एक ब्राह्मण होता. त्याच्या विमला व सुशीला अशा दोन बायका होत्या. दोघीही पतिसेवेंत तत्पर असत; पण विमला जरा मत्सरी होती.

एक दिवस सुशीला नित्यनियमाप्रमाणें सकाळीं उठून यमुनेवर

पाणी आणण्यास गेली, तों तिथें नगरांतील लोकांची स्नानासाठीं गर्दी झाली होती. ती पाहून सुशीला पाणी घेऊन घरीं आली आणि तिनें पतीला विचारलें कीं, आज कोणता पुण्यकाळ आहे म्हणून लोक यमुनेवर स्नानासाठीं गेले आहेत ?

शाकली म्हणाला, " प्रिये, ज्यांत सूर्यसंक्रांत नाहीं असा जो विष्णूस प्रिय असा अधिक मास तो आजपासून लागला आहे. यांत जें पुण्यकर्म करावें तें अक्षयी होऊन वैकुंठीं वास मिळतो. या मासांत जो कोणी पुरुषोत्तमासमोर दीप लावील तो पुनः कधीं भूमीवर जन्मास येत नाहीं. " पतीचें हें भाषण ऐकून सुशीला म्हणाली, " आपली आज्ञा असल्यास मी अधिक मासांत स्नान व दीपप्रज्वलन करण्याचें व्रत करतें. " शाकलीनें तिला आज्ञा दिली व ती नित्य नदीवर जाऊन स्नान करून घरीं येऊन पुरुषोत्तमासमोर दीप पाजळूं लागली.

पण सुशीलेचें हें व्रत पाहून तिच्या सवतीला—विमलेला—दुःख वाटलें. तिनें घरकाम सोडून सुशीलेच्या व्रतास विघ्न करण्याचें मनांत आणलें; आणि कधीं दिव्यांतील तेलच काढून घ्यावें, कधीं जातां येतां फुंकर मारून दिवा विझवावा, कधीं वस्त्रानें दीप मालवावा असें तिनें आरंभिलें. तिचें कृत्य सुशीलेनें जाणलें; पण ती तिला कांहीं एक बोलली नाहीं. गेलेला दीप पुनः पाजळावा आणि देव व पति यांच्या प्रसादानें दीपव्रत पाळावें असें तिनें अमावास्येपर्यंत केलें. आणि पुढें या व्रताचें उद्यापन करून ब्राह्मणांस भोजन व दक्षिणा देऊन संतुष्ट केलें.

कांहीं काल गेला आणि त्या दुष्ट विमलेचे मुलगे अकस्मात मेले; तिच्या दोन्ही डोळ्यांना अंधत्व प्राप्त झालें. ती अगदीं कृश झाली. त्यामुळें वेळेवर अन्न--पाणी न मिळतां ती चडफडत असे. अशा स्थितींत असतांनाच एक दिवस तिला मृत्यु आला आणि ती परलोकीं गेली. तिथल्या तिच्या यातना तर अधिकच कष्टदायक होत्या. त्या यातना भोगल्यावर तिला मृत्युलोकांत निरनिराळे जन्म प्राप्त झाले आणि तेही कष्टांतच गेले.

उलटपक्षीं सुशीला जन्मभर सुख भोगून कालान्तरानें देहपात झाल्यावर आपल्यामागें गडगंज संतति व संपत्ति ठेवून पतीसह वैकुंठीं गेली.

## ११ मांजराचें नशीब

पूर्वीं सरस्वती--तीरावर सुशर्मा नांवाचा एक ब्राह्मण होता. तो भिक्षा मागून कुटुंबाचें पोषण करीत असे. नित्य विष्णु-पूजन व दीपस्थापनही करीत असे. असा त्याचा नेम चालला असतां अधिक मास आला. तेव्हा तो पुरुषोत्तमाची पूजा व दीपस्थापना अधिकच निष्ठेनें करून श्रीहरिचिंतन करीत असे.

त्याच्या शेजारीं एक मांजर असे. तेंही रात्रीच्या वेळीं तिथें उंदीर शोधण्यास येत असे. होतां होतां एकादशीच्या दिवशीं सुशर्मा पूजन करून नामस्मरण करीत बसला असतां मध्य रात्रीच्या सुमारास कित्येक उंदीर दिव्याजवळ आले. त्यावेळीं दिव्यावर काजळी धरल्यामुळें प्रकाश मंद झाला होता. इतक्यांत मांजरानें उंदरावर उडी घातली तों मांजराच्या धक्क्यानें समई हालून काजळी

पडली व प्रकाश तेजस्वी झाला. सकाळीं कांहीं कारणानें तें मांजर मरून पडलें. परंतु त्याच्या धक्क्यानें रात्रीं दिवा प्रज्वलित झाला होता, तें पुण्य त्याच्या गांठीं पडल्यामुळें त्याला विमान आलें आणि त्यांत बसून तें वैकुंठीं गेलें.

अधिक मासांतील दीपप्रज्वलनाचा महिमा हा असा आहे. या दीपांत घालावयाची वात सात तंतूंची आणि सात अंगुळें प्रमाणाची असावी आणि दीपाला तूप किंवा तेल घालावें या दीपपूजेचें महत्त्व असें वर्णिलें आहे कीं " जे अधिक मासांत विधिपूर्वक दीप लावितात ते जन्ममरणापासून मुक्त होतात. गाई, भूमि, सोनें इत्यादींच्या दानानें मनुष्यास जें पुण्य लाभतें तेंच अधिक मासांतील दीपदानानेंही लाभतें."

## १२ मणिग्रीवाची कहाणी

पूर्वी 'चित्रबाहू' नांवाचा एक राजा होता. त्याच्या बायकोचें नांव 'चित्रकला' असें होतें हा राजा शूर, परम दयाळू, सत्य भाषण करणारा व प्रजेचें पुत्रवत् पालन करणारा होता. त्याची स्त्रीहि पतिसेवातत्पर असे. एके दिवशीं अगस्ति मुनि त्या राजाकडे आला असतां राजानें त्याचें पूजन करून आपलें सारें राज्य त्याला अर्पण केलें. पण अगस्तीनें तितक्याच निःस्पृहतेनें तें पुनः त्याच्याच स्वाधीन करून त्याला सांगितलें कीं "बाबारे, तूं राज्य अर्पण केलेंस तें मला पोंचलें. पण आतां माझ्या आज्ञेनेंच याचा सांभाळ कर म्हणजे झालें."

असें बोलून अगस्ति जावयास निघाला, तोंच चंद्रकला राणीनें येऊन नमस्कार केला. तिला अगस्तीनें आशीर्वाद दिला कीं "तुझें जन्मभर सौभाग्य असो ! तूं पतीची सेवा करून निरंतर श्रीकृष्णाची भक्ति कर आणि त्रिलोकीं पतिव्रतांत प्रमुख हो."

राजा तिथें होताच. त्यानें अगस्तीला पुनः विनंति केली कीं, आपले पाय माझ्या घराला लागले, त्यामुळें मी धन्य झालों. माझ्यासारखा भाग्यवान् कोणी नाहीं असें मी समजतों. पण मला एक शंका आहे कीं, हें भाग्य मला कशानें मिळालें ?

राजाचें हें भाषण ऐकून अगस्ति किंचित् काल स्तब्ध राहिला आणि नंतर सर्वांना बसावयास सांगून त्यानें राजाला त्याचें पूर्व-जन्माचें वृत्त सांगितलें तें असें :—अगस्ति म्हणाला, "राजा, तूं पूर्वजन्मीं चमत्कार नांवाच्या नगरींत 'मणिग्रीव' नांवाचा एक शूद्र होतास. त्यावेळीं 'सुंदरी' नांवाची तुझी बायको होती. तूं रात्रंदिवस असंख्य जीवांचा संहार करीत होतास. तुझी बायको मात्र पतिव्रताधर्मानें वागून रात्रंदिवस तुझी सेवा करीत असे. पुढें तुझ्या दुर्गुणांमुळें तुझ्या ज्ञातिबंधूंनीं तुला वाळींत टाकलें. 'बृहद्बळ' नांवाच्या त्या वेळच्या राजानें तुझें सर्व द्रव्य हरण केलें. त्यामुळें तूं दरिद्री झालास आणि नाइलाजानें अरण्यांत जाऊन तेथल्या जीवांना मारून उदरपोषण करूं लागलास. 'सुंदरी' नें मात्र तशा स्थितींतही तुला सोडलें नाहीं.

एकदां तूं मृगयेकरतां घोर अरण्यांत धनुष्यबाण घेऊन फिरत असतां 'उग्रदेव' नांवाचा तपस्वी ब्राह्मण प्रयागास जात

असतां रस्ता चुकून त्या अरण्यांत आला होता, तो तुला आढळला. तो भुकेनें व्याकूळ झाला होता. तुला त्याची दया आली आणि तूं त्याला आपल्या झोंपडीकडे आणून त्याला त्या रानांतलीं मधुर फळें खावयास दिलींस. तीं खाऊन ब्राह्मण संतुष्ट झाला. नंतर त्यानें ‘ तूं कोण ? इथें रानांत कां राहतोस ? ’ वगैरे हकीगत विचारली. तूं त्याला आपलें पूर्ववृत्त सांगितलेंस. त्यावर तो ब्राह्मण म्हणालाः—‘ ठीक. मणिग्रीवा, तूं धन्य आहेस. या वनांत तूं माझा जो सत्कार केलास त्यामुळें तुझें यापुढें कल्याणच होणार आहे. यापुढें तिसरा महिना ‘ पुरुषोत्तम ’ नांवाचा येईल. त्यांत तुम्ही दोघांनीं नजीकच्या सरोवरावर स्नान करून पुरुषोत्तमाप्रीत्यर्थ दीप लावावा म्हणजे तुमचें दारिद्य दूर होईल. तूप किंवा तेल इथें मिळालें नाहीं तर हिंगणबेटाच्या तेलाचा दिवा लावीत जा. म्हणजे तुमचें दुःख जाऊन लक्ष्मी वाढून सुख प्राप्त होईल. ’

एवढें सांगून तो ब्राह्मण प्रयागास निघून गेला आणि तूं आपल्या पत्नीसह तिथेंच पुरुषोत्तमाचें चिंतन करीत राहिलास. पुढें ब्राह्मणानें सांगितल्याप्रमाणें अधिक मास आला तेव्हां उग्रदेवाचें स्मरण करून तुम्हीं त्यानें सांगितल्याप्रमाणें आचरण केलेंत. नित्य नियमानें एक महिना दीप लाविलात. त्या दीपाच्या प्रभावानें पावन होऊन तुमची वृत्ति पुरुषोत्तमाच्या ठायीं जडली आणि कालांतरानें मृत्युलोक सोडून तुम्हीं स्वर्गलोकीं गेलां. तिथेंही तुम्हांला नाना सुखें भोगावयास मिळालीं होतीं. तीं भोगून तुम्हीं पुनः मृत्युलोकीं आलां तीं चित्रबाहू व चंद्रकला या रूपानें. ”

एवढें सांगून अगस्तिमुनि निघून गेला आणि चित्रवाहू नि चंद्रकला हीं जन्मभर सुख भोगून अंतीं मोक्षपदास गेलीं.

## १३ कांहीं सोपीं व्रतें

व्रत म्हणजे नियम. हे नियम पाळण्याला संयमाची आवश्यकता असते. पण संयम एकदां साधला म्हणजे यज्ञयागादि कृत्यांनीं जें फल मिळावयाचें तें या व्रतांनींही मिळतें.

पहिला अगदीं सोपा उपाय म्हणजे हरिनामाचा जप. ह्या जपाचा प्रभाव एवढा मोठा आहे कीं एखादा देश जरी अपवित्र असला तरी तिथें जर श्रीहरीच्या नांवाचा जप करणारे भक्त असतील तर तो देश पवित्र गणला जातो. पुष्कळ लोक कलियुग हें नीच युग समजतात. पण खरें म्हणजे या कलियुगासारखें उत्तम युग नाहीं. कारण या युगांत स्वल्प धर्माचरणानेंही मोठें फळ प्राप्त होतें. नेहमींच्या दिवसांतली जर ही स्थिति तर अधिक मासासारख्या पुण्यपावन महिन्यांत हरिनाम घेतलें असतां त्याचें केवढें फल मिळेल बरें ?

अन्नदान हा दुसरा सोपा उपाय आहे. ‘ अन्नं ब्रह्म ’ अशी श्रुतिच आहे. तेव्हां किंचित् अन्नदान केलें तरी सर्व कर्मांचें फल प्राप्त होतें.

तिसरा सुलभ उपाय म्हणजे उपवास. उपवास करणें तो महिनाभर, पंधरा दिवस, सहा रात्री, तीन रात्री किंवा एक दिवस शक्तिमानाप्रमाणें करावा.

एकांतरोपवास म्हणजे एक दिवसाआड भोजन करणें. ज्यांना लांब मुदतीचा उपवास झेपण्यासारखा नाहीं त्यांच्यासाठीं उपवासाचा हा पर्याय असून अधिकमासांत हें व्रत आचरिल्यानें इतर व्रतांच्याच तोडीचें फल मिळतें.

एकभुक्त म्हणजे दोन प्रहरीं एकाच वेळीं एकच अन्न खाणें. हविष्यान्न म्हणजे तांदूळ, जव, तीळ, कांग, राळे, वाटाणे, सावे, गहूं यांपैकीं एकच पदार्थ उपवासाच्या दिवशीं भक्षण करणें, असेही उपवासाचे पर्याय आहेत.

मौनभोजन हें आणखी एक ऐहिक व पारलौकिक सुखाचें सुलभ साधन आहे. मौनभोजन म्हणजे भोजनाच्या वेळीं न बोलणें. उपवास करण्याला ज्याला सामर्थ्य नसेल त्यानें हें व्रत आचरावें.

## १४ पंचपर्व-महिमा

विशिष्ट दिवशीं विशिष्ट तिथि—नक्षत्र-ग्रहादिकांचा योग झाला म्हणजे त्याला पर्व म्हणतात. सोमवती, अर्धोदय, महोदय इत्यादि हीं पर्वें होत. पौर्णिमा, अमावास्या, एकादशी, द्वादशी इत्यादि तिथि आणि वैधृति, व्यतिपात इत्यादि योग हींही पर्वेंच आहेत. अधिक मास हा तीन वर्षांच्या अंतरानें येणारा, त्यामुळें त्यांतील हीं पर्वें अधिकच पुण्यप्रद मानतात.

दैत्यांतील प्रल्हादानें अधिक मासांत वैधृति योगावर स्नानदान—होमादि कर्में केलीं होतीं. त्या पुण्यप्रभावानें त्याला इंद्रत्व प्राप्त झालें. वैधृति योगाचें व्रत साखर, मध,

तूप, दूध किंवा तिळांचे लाडू, अथवा नारळ किंवा सोळा विडयाचीं पानें व सोळा सुपाऱ्या यांच्या दानानें आचरावें.

व्यतिपात योगाच्या प्रभावानें यम धर्मत्व पावून त्रैलोक्यांतील सर्व जनांस प्रिय झाला. चंद्र–सूर्याच्या संयोगानें व्यतिपाताची उत्पत्ति झाली आहे. या योगीं दिलेलें दान अनंत फलदायी होतें.

पौर्णिमा हें केवळ देवतीर्थ आहे. या दिवशीं देवांचीं कर्मे केलीं असतां, जसे पितर अमावास्येच्या दिवशीं तृप्त होतात तशा देवता संतुष्ट होतात.

अमावास्येचेंही असेंच. या दिवशीं पितर आनंदित होतात. जसा थंडीनें कुडकुडलेला वस्त्राची किंवा विस्तवाची, अथवा भुकेलेला अन्नाची इच्छा करतो, त्याप्रमाणें प्रत्येक अमावास्येस पितर श्राद्धाची इच्छा करतात. अधिक मासांतील अमावास्येला केलेलें श्राद्ध अथवा इतर पुण्यकृत्य तर कोटिगुणयुक्त होतें.

द्वादशी ही सर्व पर्वांची राणीच मानलेली आहे. पूर्वकालीं ऋषि, गंधर्व, ब्रह्मदेव व श्रीहरि विचार करीत असतां, त्यांनीं द्वादशीसारखें जगांत दुसरें पर्व नाहीं असें ठरविलें. एकादशीस रात्र–दिवस उपोषण करून द्वादशीच्या दिवशीं काशाच्या पात्रांत तूप घालून सुवर्णाच्या प्रतिमेसह पूजा करून दान दिलें असतां सर्व दानें व तपें यांचें फल मिळतें.

## १५ पुण्यदानानें पतितोद्धार

इंद्रलोकीं कुबेराची एक आवडती अप्सरा होती. तिचें नांव स्मितविलासिनी. ती एकदां आपल्या मैत्रिणींना बरोबर घेऊन

क्रीडा करण्याकरतां मृत्युलोकीं कुरुक्षेत्रांत आली. तिनें सख्यां-बरोबर क्रीडा केल्यावर उत्तम सुगंधी पुष्पें वेंचून त्यांची एक माळ गुंफिली. पण ती गळ्यांत घालण्याजोगा तिच्या अनुरूप असा पुरुषच तिला आढळेना ! इतक्यांत महाकोपी दुर्वास मुनि तिथें आला. त्याला पाहतांच तिच्या सख्या पळून गेल्या पण हिनें मात्र तो ऋषि जवळ येतांच मागचा पुढचा विचार न करतां ती माळ त्याच्या गळ्यांत घातली !

मग काय विचारतां ! त्यानें तिला शाप दिला कीं, " जा, आतां तूं पिशाच्च होऊन पृथ्वीवर भटकत रहा ! " ऋषीच्या तोंडची ही शापवाणी ऐकतांच स्मितविलासिनी भानावर आली. तिनें ऋषीचे पाय धरून क्षमा मागितली. दुर्वास कोपिष्ट होता तरी शरणागताला क्षमा करण्याविषयींही तो दक्ष असे. तो म्हणाला, " माझें शापवचन खोटें व्हावयाचें नाहीं. तूं पिशाच्च होणारच, पण यामुळें पुढें तुझें कल्याण होईल. कसें तें सांगतों:—

दक्षिण दिशेला कुमारी नांवाचें क्षेत्र आहे. तिथें कांहीं वर्षांनीं याज्ञवल्क्य कुलांत उत्पन्न झालेली एक तापसी स्त्री तप करण्या-करतां येईल. ती तप करीत असतांना ज्या ज्या वेळीं अधिक मास येईल, त्या त्या वेळीं त्या महिन्यांत स्नान–दान–दीपार्चन–उपवासादि व्रतांचें ती आचरण करील. तूं त्या बाजूला फिरतां फिरतां एका अधिक मासांतील कृष्ण द्वादशीच्या दिवशीं त्या कुमारी क्षेत्रांत जाशील. तिथें त्या तापसीला पाहून तूं तिला भक्षण करण्याच्या हेतूनें तिच्याजवळ जाशील. पण तिच्या सभोंवारच्या तपाच्या तेजानें तुला पूर्वजन्माचें स्मरण होईल

व तूं तिचे पाय धरून पिशाच्च योनींतून मुक्त करण्याविषयीं तिची प्रार्थना करशील. आणि ती एका अधिकमासांतील व्रत-फलाचें पुण्य तुला अर्पण करून तुला माझ्या शापापासून मुक्त करील. " त्याप्रमाणें खरोखरच पुढें घडून आलें.

## १६ भूताची मुक्ति

दक्षिण देशांत गोदावरीच्या तीरीं पैठण नगरींत ' धर्मशर्मा ' नांवाचा एक ब्राह्मण राहत होता. तो बुद्धिमान व महाविद्वान होता. त्याची वागणूक नियमबद्ध होती. तथापि जसजसा वृद्धापकाल झाला, तसतशी त्याची शक्ति क्षीण होत गेली, आणि पुढें पुढें तर त्याच्या निवासस्थानापासून दूर असलेल्या गोदावरी तीरावर त्याला दररोज स्नानासाठीं जाणें अशक्य झालें, इतक्यांत एकदां अधिक मास आला. याला तर नित्य-स्नान करणें अशक्य झालें होतें. म्हणून त्यानें श्रीहरीचें स्मरण करून महिना संपतेवेळीं तीनच दिवस स्नान करण्याचें ठरविलें.

दोन दिवस निर्विघ्नपणें गेले. तिसऱ्या दिवशीं नित्याप्रमाणें पहांटेस उठून स्नान करून पाण्यानें भरलेला कमंडलू घेऊन परत येत असतां एक भयंकर भूत त्याला आडवें आलें. तें भुकेनें व्याकुळ झालें होतें. तें अक्राळविक्राळ भूत वाटेवर आलेलें पाहून ब्राम्हणाला आज हा काय प्रकार आहे कळेना. पण त्या ब्राह्मणाची नि त्या भुताची दृष्टादृष्ट होतांच तें भूत हात जोडून त्या ब्राह्मणाला म्हणालें, ' बाबा, भिऊं नको. मीं सर्व जनांस पीडा देणारें भूत आहें हें खरें. पण आतां तुझ्या केवळ

दर्शनानेंच मला पूर्वजन्मांतील सारीं कृत्यें आठवूं लागलीं आहेत. मी पूर्वजन्मीं पुष्कळ पापें केलीं होतीं. त्यांचीं फळेंही मीं मेल्यानंतर भोगलीं आणि मग या भूतयोनींत आलों. तेव्हां कृपा कर आणि माझी मुक्तता कर.'

धर्मशर्म्यानें हातांत पाणी घेऊन नुकत्याच अधिक मासांत केलेल्या स्नानाचें पुण्य त्या भुताच्या हातावर सोडलें. त्याबरोबर तें पिशाच्च दिव्यरूप झालें आणि विष्णुदूतांनीं विमानांतून त्याला वर नेलें.

## १७ गुणवती विरुद्ध यशोमती

वीरबाहु नांवाचा एक राजा होता. त्याच्या राणीचें नांव यशोमती असें होतें. त्याचा प्रधान होता त्याचें नांव मंडन व मंडनाच्या बायकोचें नांव होतें गुणवती. राजा व प्रधान यांची ही जोडी कर्मानें मात्र परस्पर विरुद्ध होती. म्हणजे असें कीं राजा नेहमीं विलासांत निमग्न आणि राणी यशोमती आपल्याच तोऱ्यांत असावयाची! उलट प्रधान मंडन आपल्या कर्तव्यांत दक्ष व प्रजेच्या हिताकडे लक्ष देणारा होता व त्याची स्त्री गुणवती धर्मकार्यांत दक्ष असे.

पुढें एकदां गुणवतीनें यशोमतीची भेट घेऊन तिला म्हटलें, 'सखे, तूं माझी स्वामिनी आहेस. श्रीहरीचा आवडता अधिक मास आला आहे. यांत किंचित् सत्कर्म केलें असतां अनंत फळांचा लाभ होतो. तेव्हां यांतील व्रतांपैकीं कांहींचें तरी आचरण कर.' पण यशोमतीनें कांहीं तें मनावर घेतलें नाहीं. उलट ती गुणवतीला म्हणाली :—" तूं इतर गोष्टी बोलावयाच्या

सोडून हा अधिक मास कुठून आणलास ?" गुणवतीला वाईट वाटलें. पण तें राणीस न दाखवितां ती इतर कांहीं गोष्टी बोलून निघून गेली.

पुढें अधिक मास आला. तेव्हां गुणवतीनें या मासांत आचारावयाचीं कित्येक व्रतें आचरिलीं. त्या योगानें तिच्या सौभाग्याची वृद्धि झाली आणि तिकडे राजा व राणी यांना राणीनें अधिक मासाची निंदा केल्यामुळें विपत्तींवर विपत्ति भोगाव्या लागल्या. त्यांचे दोघे मुलगे अकस्मात् वारले. तेव्हां रीतीप्रमाणें गुणवती यशोमतीच्या समाचारास गेली असतां गुणवतीच्या मुखावरचें तेज व तिच्या अंगावरचे सौभाग्यालंकार पाहून यशोमतीला दुःख झालें. ती गुणवतीला टाकून बोलली. राजानेंही प्रधान व त्याची बायको या दोघांना बंदींत ठेवण्याचा हुकूम केला आणि त्यांच्या घरांतील द्रव्य लुटून आणलें.

अशा रीतीनें बंदिवासांत असतां प्रधान मंडन व त्याची बायको यांनीं श्रीहरीचें स्मरण मात्र सोडलें नाहीं. तेव्हां श्रीहरीनें राजा–राणीच्या स्वप्नांत जाऊन सांगितलें कीं, "अरे वीरबाहु, मंडन प्रधान व त्याची बायको निरपराधी आहेत. त्यांना तूं सोडून दे. अधिक मास व्रताचें फल त्या उभयतांस सांप्रत मिळालें आहे."

त्याप्रमाणें पुढें राजानें दोघांनाही बंधमुक्त केलें. त्यांनीं सांगितल्याप्रमाणें पुढच्या अधिकमासाच्या वेळीं व्रतें आचरिलीं आणि नंतर अनेक वर्षें वैभव भोगून तीं दोघेंही वैकुंठाला गेलीं.

# १८ श्रीपुरुषोत्तमस्तोत्रम् ।

"वन्दे विष्णु गुणातीतं, गोविन्दमेकमक्षरम् । अव्यक्तमव्ययं व्यक्तं, गोपवेषविधायिनम् ॥ १ ॥ किशोरवयसं शान्तं, गोपीकान्तं मनोहरम् । नवीन-नीरदश्यामं, कोटिकन्दर्पसुन्दरम् ॥ २ ॥ वृंदावन-वनाभ्यन्ते रासमण्डलसंस्थितम् । लसत्पीतपटं सौम्यं, त्रिभङ्गललिताकृतिम् ॥ ३ ॥ रासेश्वरं रासवासं, रासोल्लाससमुत्सुकम् । द्विभुजं मुरलीहस्तं, पीतवास-समच्युतम् ॥ ४ ॥ इत्येवमुक्त्वा तं नत्वा, रत्न-सिंहासने वरे । पार्षदैः सत्कृतो विष्णुः, स उवास तदाज्ञया ॥ ५ ॥ श्रीनारायण उवाच—इति विष्णुकृतं स्तोत्रं, प्रातरुत्थाय यः पठेत् । पापानि तस्य नश्यन्ति, दुःस्वप्नः सत्फलप्रदः ॥ ६ ॥ भक्तिर्भवति गोविन्दे, पुत्रपौत्रविवर्धिनी । अकीर्तिः क्षयमाप्नोति, सत्कीर्ति-र्वर्धते चिरम् ॥ ७ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥